# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

■ शके १९४८ ■ वर्ष २६ ■ अंक ०४ ■ जुलै २०२६ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/- ■ पृष्ठ संख्या २८

■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 26 ■ ISSUE NO 04 ■ July 2026 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 28




## कानडा राजा पंढरीचा


अंक www.vhp.org वर उपलब्ध





E-mail : hindubodh.pmp@gmail.com



शिक्षणाच्या वाढत्या खर्चासाठी,
आता मदत जनता बँकेची!
जनता
एज्युफ्लेक्स
कर्ज योजना
शिक्षण व वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य, इ.साठी कर्ज
देशांतर्गत शिक्षणासाठी ₹50* लाख
परदेशी शिक्षणासाठी ₹1* कोटी
आकर्षक व्याजदर
*अटी व नियम लागू.
जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. दूरध्वनी : ०२०-२४४५३२५८ / ५९
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258
www.jsblpune.bank.in

मासिक
# हिंदुबोध
**वर्ष – सव्वीसावे : अंक ४ था**
शके १९४८
**जुलै २०२६**

**संपादक**
**श्री. रविकांत कळंबकर**
ravi.kalambkar@gmail.com

**निवास**
**एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६, आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ, निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४**

अंक www.vhp.org संकेतस्थळावर उपलब्ध

**संपादक मंडळ**
श्री. किशोर चव्हाण – प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे – प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक – प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी – प्रांत प्रचार–प्रसार प्रमुख
श्री. संजय गोडबोले – प्रांत प्रचार–प्रसार सहप्रमुख
श्री. अनिल सांबरे – नागपूर
श्री. विजयकुमार पिसे – सोलापूर

**संपादक मंडळ सदस्य**
श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

**पत्र व्यवहार**
व्यवस्थापक
मनोज शेलार
मो: ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/–, वार्षिक वर्गणी रु. २००/–

**मुद्रण स्थळ**
संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.
दूरभाष : २४४८ ५६ ३२
sanwadpvt@gmail.com

## अनुक्रमणिका

✦ संपादकीय.... जगण्याची कला शिकवणारे विद्यापीठ, म्हणजे वारी
श्री. श्रीपाद श्रीकांत रामदासी .................... ०५

✦ वि. हिं. परिषद प्रांत वृत्त .............................................. ०६

✦ चांगल्या बातम्या
कुमार आठवले .................................... १३

✦ गुरु शिष्य परंपरा – ज्ञानाचा अखंड स्रोत!
ॲड. स्वाती जेरे .................................. १५

✦ जागतिक पर्यावरण दिवस...
डॉ. संजीव दाते .................................. १७

✦ लोकसंख्याशास्त्र
डॉ. पंकज जयस्वाल ............................. २०

✦ मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
डॉ. सचिन लादे .................................. २३

✦ आषाढी वारी : हिंदू धर्मातील भक्ती, अद्वैत आणि लोकविलक्षण साधना
...................................................... २५

प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

’हिंदुबोध’ मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी – ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

**“Hindu Bodh” Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

## ।। समर्थ अभंग ।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

येथे कां रे उभा श्रीरामा। मनमोहन मेघश्यामा ।।१।।

चाप बाण काय केलें । कर कटावरी ठेविले ।।२।।

कां बा धरिला अबोला । दिसे वेष पालटला ।।३।।

काय जाली अयोध्यापुरी । येथे बसविली पंढरी ।।४।।

शरयूगंगा काय केली । कैची भीमा मेळविली ।।५।।

किल्किलाट वानरांचे ।थवे न दिसती तयांचे ।।६।।

दिसे हनुमंत एकला । हा कां सैन्यांतुनी फूटला ।।७।।

काय जाली सीता सती । येथे बहुत जन दिसती ।।८।।

रामदासीं सद् भाव जाणा । राम जाला पंढरिराणा ।।९।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरू झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/– फक्त आहे. वार्षिक रु. २००/– तर त्रैवार्षिक रु. ५००/– वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

**श्री. रविकांत कळंबकर**
(संपादक)

**श्री. किशोर चव्हाण**
(प्रांत मंत्री)

**श्री. पांडुरंग राऊत**
(प्रांत अध्यक्ष)

# जगण्याची कला शिकवणारे विद्यापीठ, म्हणजे वारी...

संपादकीय

शतकानुशतके कोणीही ना आमंत्रण पत्रिका छापते, ना कुणी कोणाला वारीमध्ये सामील होण्याचे आवाहन करते, ना कोणाला सामील होण्याचे मानधन मिळते, तरीही बरोबर ज्या त्या तिथीला, जो तो आपापल्या दिंडीसोबत हजर.

वारी... या दोन अक्षरांमध्ये एवढी जबरदस्त शक्ती आहे कि केवळ या दोन शब्दांचा महामंत्र, लाखो भाविकांना शेकडो किलोमीटर चालण्याची ऊर्जा देतो.

जात, पंथ,वर्ण, वंश, आपले समाजातील स्थान, आर्थिक परिस्थिती, कौटुंबिक प्रश्न, हे सगळे आपोआप बाजूला सारून वारकरी अखंड चालत असतो, विठू नामाचा गजर करीत असतो.

जगद्गुरू तुकोबाराय म्हणतात विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ म्हणूनच भेदभाव विसरून एक होणे म्हणजे नेमके काय ते वारीतच कळते, समरसता प्रत्यक्षात उतरते ती इथेच.

मला पोटाला अन्न मिळेल का? झोपायला जागा मिळेल का? परगावात माझे कसे होईल? पाऊस आला तर कसं? हे असले प्रश्न कधीच कोणत्याही वारकऱ्याला भेडसावत नाहीत. त्याला एवढेच कळते की, ‘जो चोच देतो, तोच दाणाही देतो.’

समर्थांनीही म्हटलेच आहे की,

**रघुवीर सुखदाता सोडवी अंतकाळी.**

वारीमध्ये भुकेल्याला अन्न मिळते, तहानलेल्याला पाणी मिळते, एकटेपणा वाटणाऱ्याला सखे सोबती मिळतात, हौश्याची हौस फिटते, नवश्याचा नवस फिटतो तर गावश्याला हवे ते गवसतेच, व्यावसायिकांना उद्योग मिळतो, तर समाजसेवकांना सेवेचे समाधान मिळते.

भागवत धर्माची परम पवित्र भगवी ध्वजा खांद्यावर तर आरोग्यदायी, मंगलकारी तुळस डोईवर घेऊन लहान, थोर, महिला, पुरुष, युवती, युवक, वयस्कर सगळे सगळे त्या सावळ्या विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने अहोरात्र प्रवास करत असतात.

एकादशीला तर चंद्रभागेच्या तीरावर भक्तीची गंगाच नव्हे तर महासागर लोटतो... वारीमध्ये छोट्या मोठ्या कुरबुरी होतही असतील परंतु मान–पान, मोठेपणा यांवरून कधीच वाद होताना निदान मला तरी दिसले नाहीत. उलट वारीमध्ये एकमेकांच्या पाया पडण्याची पद्धत आहे. स्वतःच्या मोठेपणाचा फुका अभिमान गळून पडतो तो फक्त वारीतच. म्हणूनच जगद्गुरू तुकोबारायांनी म्हटले आहे की,

**‘‘पंढरीसी नाही फुका अभिमान,**
**पाया पडे जन एकमेका...’’**

जाता जाता एवढेच सांगावेसे वाटते की जीवन जगण्याची कला शिकवणारे विद्यापीठ, म्हणजे वारी. कुठेही अनाठायी न रमता, अति चिंता विवंचना न करता, न थकता, कोणाचाही द्वेष, मत्सर न करता, ईश्वराचे गुणगान करीत, अविरतपणे आपल्या अंतिम ध्येयाकडे चालत राहणे, पुन्हा पुन्हा चालत राहणे हिच या वारीची शिकवण आहे असेच मला वाटते.

देहू आणि आळंदीच्या संतश्रेष्ठांच्या पालख्या आपल्या पुण्यात असणार आहेत. जमलं तर जरूर दर्शन घ्या आणि आयुष्यात किमान एकदातरी वारकरी व्हाच !!!

।। पांडुरंग हरी वासुदेव हरी...
नित्य घडावी तुझीच वारी ।।

**श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈



## विहिंप, हडपसर जिल्हा

मंगळवार, दिनांक ९ जून २०२६ रोजी विश्व हिंदू परिषद, हडपसर जिल्हा व श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शेवाळेवाडी ग्रामपंचायत कार्यालय येथे मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

सदर शिबिराचे उद्घाटन पुणे पूर्व विभाग मंत्री मा. श्री. संतोषजी अनगोळकर, हडपसर जिल्हा अध्यक्ष श्री. नंदकिशोर (काका) काळभोर, जिल्हा उपाध्यक्ष ॲड. श्री. मनोज काळे, जिल्हा मंत्री श्री. राजेंद्र शेवाळे, मातृशक्ती संयोजिका सौ. विजयाताई रणभोर, सहसंयोजिका सौ. पुष्पलताताई गावडे, सौ. किशोरीताई कुलकर्णी, जिल्हा सामाजिक समरसता प्रमुख श्री. अक्षय आबनावे, धर्माचार्य संपर्क प्रमुख श्री. संतोष वैद्य, सहप्रमुख श्री. श्रीपाद काशीकर व बालसंस्कार प्रमुख श्रीमती कल्पनाताई क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतमाता व प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

शिबिरामध्ये खालील सुविधांचा समावेश होता :

- नेत्र तपासणी व आय ड्रॉप्स
- मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी तपासणी व नोंदणी
- दंत तपासणी व स्कॅन
- जनरल ओपीडी व औषधोपचार
- रक्तातील साखर तपासणी
- रक्तदाब तपासणी

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट यांच्या वतीने अनुभवी डॉक्टर, अद्ययावत तपासणी यंत्रणा, रुग्णवाहिका व आवश्यक कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले.

या आरोग्य शिबिराचा शेवाळेवाडी व परिसरातील १९३ लाभार्थी रुग्णांनी लाभ घेतला. तसेच १६ रुग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नोंदणी करण्यात आली, त्यापैकी ०२ रुग्णांना तत्काळ शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.याशिवाय ६० रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा कार्यकारिणी सदस्य श्री. आबासाहेब गायकवाड, छत्रपती संभाजी महाराज प्रखंड उपाध्यक्ष श्री. विनोद शेवाळे, प्रखंड बजरंग दल संयोजक श्री. संतोष खवले, प्रखंड कार्यकर्ते श्री. गणेश मदने, शेवाळेवाडी ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव श्री. चंद्रकांत (दादा) उमरदंड, सौ. प्रियांकाताई जगदाळे व सौ. स्वातीताई आटोळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी हडपसर जिल्हा मंत्री श्री. राजेंद्र शेवाळे यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, उपस्थित डॉक्टर व सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. तसेच त्यांचा हडपसर जिल्ह्याच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

भविष्यातही अशाच प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम व सहकार्य लाभावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**श्री. राजेंद्र शेवाळे,**
**(मंत्री, हडपसर जिल्हा)**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता वेल्फेअर सोसायटी**






# दुर्गावाहिनी शौर्य प्रशिक्षण वर्ग २०२६

विश्व हिंदू परिषद दुर्गावाहिनीद्वारे दरवर्षी मे महिन्यात शौर्य प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते. पश्चिम महाराष्ट्र प्रांताचा शौर्य प्रशिक्षण वर्ग २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दिनांक १६ मे ते २३ मे २०२६ या कालावधीत पुणे जिल्ह्यातील पिरंगुट येथील राणी लक्ष्मीबाई सैनिक शाळेत हा वर्ग आयोजित करण्यात आला होता.

विवाहित व अविवाहित, वय वर्षे १५ ते ३५ या वयोगटातील युवतींना सेवा, सुरक्षा व संस्कारांचे ज्ञान मिळावे तसेच शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि राष्ट्रभक्त नागरिक घडावेत हा या वर्गाचा उद्देश आहे. समाजातील वाढत्या आव्हानांना सामोरे जाण्याचे शारीरिक तसेच मानसिक बळ वाढवण्यासाठीचे आवश्यक ज्ञान या वर्गातून दिले जाते.

खंबीर मन, बळकत मनगट आणि कुशाग्र मस्तिष्क तयार होण्यासाठी शस्त्र व शास्त्र दोन्हीची माहिती व प्रशिक्षण या वर्गातून दिले जाते.

या वर्गामध्ये पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील एकूण २५० दुर्गांनी सहभाग घेतला. तसेच त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी २५ प्रशिक्षिका दुर्गांनी सात दिवस अहोरात्र परिश्रम घेतले. या मध्ये मुख्य शिक्षिका म्हणून मुस्कान ताई वर्मा, शारीरिक प्रमुख म्हणून कृष्णा ताई चितळे, बौद्धिक प्रमुख म्हणून ऐश्वर्या ताई सारोळकर, कार्तिकी ताई परदेशी यांनी दायित्व पाहिले. तसेच वर्गाधिकारी म्हणून मा. सुप्रिया ताई मुजुमदार यांनी दायित्व पार पाडले. तसेच इतर सर्व व्यवस्था श्री. रोहन निकटे (मावळ मुळशी बजरंग दल संयोजक), श्री. सदानंद मारणे (जिल्हा सह मंत्री), मा. आरती ताई भारती (प्रांत सह संयोजिका), मा. सुरेखा ताई कवडे व मा. विजयराव देशपांडे (पश्चिम महाराष्ट्र प्रांत दुर्गा वाहिनी पालक) यांनी पाहिली.

वर्गातील दिनक्रम पहाटे ४.३० वाजता प्रातःस्मरणाने सुरू होत असे. या दिनक्रमामध्ये ४ तास शारीरिक प्रशिक्षण होई. व्यायाम, योग, प्राणायाम तसेच विविध शारीरिक प्रशिक्षण सत्रे यात आयोजित करण्यात आली. दंड, छुरिका, यष्टी, लक्ष्यभेद, नियुद्ध यांसारख्या विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामुळे भगिनींमध्ये शारीरिक क्षमता, आत्मविश्वास आणि मनोबल वृद्धिंगत झाले.

व्यक्तिमत्त्व विकासासाठी समता, पर्यावरण संरक्षण, आरोग्यवर्धन यांसारख्या विषयांवर विशेष मार्गदर्शन करण्यात आले. प्लास्टिकमुक्त जीवनशैली आणि पर्यावरणपूरक उपक्रमांचे महत्त्वही समजावून सांगण्यात आले.

कृत्रिम व पर्यावरणास हानी पोहोचवणाऱ्या DJ Dollby या सारख्या उपकरणांना पर्यावरणपूरक पर्याय म्हणून लेझीम व ढोल ताशे याचेही प्रशिक्षण दुर्गांना देण्यात आले.

दुर्गांच्या मनामध्ये हिंदुत्वनिष्ठ, कर्तव्यदक्ष व समाजाभिमुख दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी विविध बौद्धिक सत्रांचे आयोजन

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

करण्यात आले. या सत्रांमध्ये विश्व हिंदू परिषद, दुर्गावाहिनी, भारताचा गौरवशाली इतिहास, हिंदू धर्मशिक्षण, हिंदू सण–उत्सवांचे महत्त्व, हिंदू संस्कृतीची वैशिष्ट्ये तसेच किशोरी समस्या या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

या वर्गामध्ये मा. पिंकीदीदी पवार (केंद्रीय सह संयोजिका) यांनी विश्व हिंदू परिषद स्थापना, उद्दिष्टे व कार्यपद्धती या विषयीची विस्तृत माहिती दुर्गांना दिली. मा. सोनाली ताई नाथ (पश्चिम महाराष्ट्र प्रांत संयोजिका) यांनी दुर्गा वाहिनी स्थापना, कार्यपद्धती, कार्यपुढील आव्हाने यांचे आकलन दुर्गांना करून दिले. मा. मिलिंद जी परांडे (अखिल भारतीय संघटन महामंत्री) यांनी हिंदू धर्मापुढील आव्हाने तसेच करणीय कार्य याचे आकलन दुर्गांना करून दिले. तसेच जगातील सर्वच धर्मांचा तुलनात्मक तर्कशुद्ध अभ्यास त्यांनी आपल्या भाषणातून मांडला. मा. गोविंद जी शेंडे (केंद्रीय सहमंत्री) यांनी भारताचा गौरवशाली इतिहास हा विषय मांडला. भारताचा इतिहास हा पराभवाचा इतिहास नसून पराक्रमाचा व विजयाचाच आहे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. व त्यास तर्कशुद्ध आधार देणारे, विजयाचा इतिहास सिद्ध करणारे दाखलेही सादर केले. मा. भाऊराव जी कुदळे (मुंबई क्षेत्र गोरक्षा प्रमुख) यांनी भारतातील सण व उत्सव हा विषय घेतला. हिंदू सण व उत्सवांचे महत्व त्यांनी पटवून सांगितले. तसेच या प्रत्येक सणांमागील विज्ञाननिष्ठ व शास्त्रीय कारणे देखील त्यांनी यावेळी स्पष्ट केली. मा. अनिरुद्ध जी पंडित (मुंबई क्षेत्र संघटन मंत्री) यांनी भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये या विषयी सखोल व अभ्यासपूर्ण माहिती दुर्गांसमोर मांडली. यामध्ये भारतातील आदर्श कुटुंब व्यवस्था ही पाश्चिमात्य देशांमध्येही अभ्यासली जाणारी आहे व अनुकरणीय समजली जाते असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. तसेच भारतीय संस्कृती ही प्रत्येक घटकांशी नाते प्रस्थापित करणारी आहे हे तर्कशुद्ध दाखल्यांसहित त्यांनी यावेळी मांडले. सौ. प्रतिभाताई बोथारे (मातृशक्ती क्षेत्र संयोजिका) यांनी किशोरी समस्या या विषयी मनमोकळ्या गप्पा दुर्गांसोबत केल्या. मा. किशोर जी चव्हाण (प्रांत मंत्री) यांनी देखील दुर्गांना जाहीर समारोपावेळी समर्पक मार्गदर्शन केले. मा. नितिन जी वाटकर (प्रांत सहमंत्री) यांनी देखील पुढील कार्यासाठी दुर्गांना मार्गदर्शन केले. यांसह अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. या मुख्य विषयांव्यतिरिक्त देखील दुर्गांसाठी काही उपयुक्त विषय मांडण्यासाठी मा. माया ताई येवले व मा. सुवर्णा ताई ढमढेरे यांनी देखील या वर्गात माहितीपूरक सत्रे घेतली.

तसेच या वर्गामध्ये दुर्गांच्या मनात अध्यात्मिकतेची बीजे रोवण्यासाठी मा. दादा वेदक यांनी आत्मरंजक सत्संग घेतला.

सर्व बौद्धिक व शारीरिक सत्रांबरोबरच सामूहिक प्रार्थना, सांस्कृतिक कार्यक्रम आणि भारतमातेची आरती यांचाही समावेश होता. यामुळे भगिनींमध्ये राष्ट्रभक्ती, संस्कार आणि संघभावना दृढ झाली.

तसेच या वर्गाला विश्व हिंदू परिषदेतील केंद्रीय, क्षेत्रिय व प्रांतीय कार्यकर्त्यांनी भेट दिली. या मध्ये मा. सरोज दीदी, मा. आशाताई टेकवडे, मा. संजय जी मुद्राळे, मा धनाजी राव शिंदे, मा. माधवी ताई सौंशी, मा. नितीन जी महाजन, मा.आप्पा कुलकर्णी, सौ शारदाताई रिकामे (मातृशक्ती प्रांत सह संयोजिका), पुणे महानगर पर्वती भाग अध्यक्ष मा. तुलसीराम जी, आचार्य मंदार यनपुरे, मुळशी येथील हरी भक्त परायण संत तसेच विभाग मंत्री यांचा समावेश आहे.

या वर्गातून मिळालेल्या प्रशिक्षणाने व प्रेरणेने सर्व दुर्गा सेवा, सुरक्षा, संस्कार, धर्मरक्षण, गोसंवर्धन आणि राष्ट्रसेवा या कार्यात अधिक प्रभावीपणे योगदान देतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. वर्ग यशस्वी करण्यासाठी पुणे महानगर येथील वि.हि प. विभाग मंत्री, सहमंत्री व कार्यकर्ते यांनी मोलाची भूमिका बजावली.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

# वार्षिक नियोजन बैठक
# विश्व हिंदू परिषद, अहिल्यानगर




७ जून २०२६, रविवार

सत्र पहिले : सर्वात प्रथम मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. परिपाठी व प्रास्ताविक/परिचय घेऊन बैठकीला सुरुवात झाली. विभाग मंत्री श्री. सुनील जी खिस्ती यांनी प्रखंडाची भौगलिक रचना व कार्यपद्धती ह्याविषयी मार्गदर्शन केले.

सत्र दुसरे : प्रखंडशा बैठक घेऊन समिती व नियमित साप्ताहिक बैठकीचे नियोजन करण्यात आले.

तदनंतर प्रमुख वक्ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जिल्हा कार्यवाह श्री,हिराकांत जी रामदासी यांचे संघटनात्मक कार्याविषयी अमूल्य मार्गदर्शन झाले.

सत्र तिसरे : आत्ताच झालेल्या विश्व हिंदू परिषदेच्या वर्गाला जाऊन आलेल्या सर्व शिक्षार्थींचे मनोगत कथन झाले.

विभागमंत्री श्री. सुनील जी खिस्ती यांनी जिल्हा व प्रखंडाच्या काही नवीन नियुक्त्या जाहीर केल्या तसेच आगामी वार्षिक नियोजनाच्या कार्याची इतंभूत माहिती व मार्गदर्शन केले व सत्संग घेऊन सत्रचा समारोप झाला.

बैठकीची संपूर्ण परिपाठी जिल्हा सह मंत्री श्री. राजेंद्र चुंबळकर यांनी घेतली तर सूत्र संचालन श्री. शरदजी नगरकर यांनी केले.

बैठकीच्या यशस्विते साठी बजरंग दल जिल्हा संयोजक श्री. सोमनाथ चितळकर, धर्माचार्य संपर्क प्रमुख, श्री. मिलिंदजी चवंडके, जिल्हा सह मंत्री श्री. प्रताप तांदळे, जिल्हा मातृशक्ती प्रमुख शहापुरे ताई, जिल्हा दुर्गावहिनी संयोजिका जयश्री ताई पोटे यांनी परिश्रम घेतले.

ह्या प्रसंगी दुर्गावहिनी विभाग संयोजिका पुजाताई लष्करे,विभाग सह मंत्री श्री. विशालजी वाकचौरे, बजरंग दल विभाग संयोजक श्री. कुलदीप जी ठाकूर, जिल्हा मंत्री श्री. अनिलजी जोशी व पूर्ण जिल्हा कार्यकारणी उपस्थित होते.

शांती मंत्र, पसायदान व राष्ट्रीय उद्घोष घेऊन बैठकीची सांगता झाली.

सर्वांसाठी नाश्ता /चहा व भोजन व्यवस्था करण्यात आली होती.

एकूण उपस्थिती ४८

महिला ...०९

पुरुष... ३९


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**





## धर्म टिकून राहण्यासाठी आर्थिक सक्षमता महत्त्वाची! - मिलिंद परांडे

पिंपरी (दिनांक : २५ मे २०२६) 'आदरणीय अशोकजी सिंघल यांनी आपल्या समर्पित योगदानातून हिंदू धर्माचा स्वाभिमान जागृत केला; पण धर्म टिकून राहण्यासाठी आर्थिक सक्षमता महत्त्वाची असते!' असे विचार विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे यांनी कामशेत येथे व्यक्त केले. श्री अशोक सिंघल मेमोरियल ट्रस्ट, मुंबई संचालित कामशेत येथील ग्रामदूत प्रकल्पा अंतर्गत आर्थिक साक्षरता व महिलांचे आर्थिक सबलीकरण या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मिलिंद परांडे बोलत होते. याप्रसंगी विश्व हिंदू परिषद अध्यक्ष प्रा. गजानन धारणे, अनिरुद्ध पंडित, प्रांतमंत्री किशोर चव्हाण, सहमंत्री ॲड. सतिश गोरडे, संस्थेचे विश्वस्त सुरेश पसारिया, मनमोहन गोयंका, पवन पोदार, बालकिशन अगरवाल, अमोल पगडे, श्याम गुजरपाध्ये आदी मान्यवर उपस्थित होते.

मिलिंद परांडे पुढे म्हणाले की, 'अजूनही ब्रिटिशांच्या गुलामगिरीच्या मानसिकतेतून स्वातंत्र्योत्तर काळातही बरेचसे भारतीय वावरताना दिसतात. वास्तविक साधूसंत आणि देशभक्तांनी समाजाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत. अशोकजी सिंघल यांनी रामजन्मभूमी मुक्ती आंदोलनाच्या माध्यमातून हिंदू समाजात चैतन्य निर्माण केले. धर्म आणि संस्कृतीशिवाय समाज एकसंध राहू शकत नाही. आदरणीय अशोकजींच्या नावाने कार्यरत असलेल्या या संस्थेचे आर्थिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रांसह शिक्षण, आरोग्य, पाणी या मूलभूत सुविधांसाठी असलेले कार्य अतिशय स्तुत्य आहे. या अंदर मावळ परिसरातील सुमारे छप्पन गावे आणि तीन वस्त्यांमधील सर्वांगीण विकासासाठी ही संस्था सातत्याने तीन वर्षांपासून कार्यरत आहे. या कामाची व्याप्ती सर्वदूर पोहोचली पाहिजे. हिंदू समाजाचा जन्मदर कमी होतो आहे, ही गंभीर बाब आहे. जनगणनेत धर्माचा उल्लेख 'हिंदू' करायला विसरू नका!' मुख्य कार्यकारी अधिकारी माणिक गवळी यांनी प्रास्ताविक केले. सुरेश पसारिया यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कांचन राळे (संगणक), पूजा जाधव (शिवणकाम), वर्षा चव्हाण, अश्विनी केंगले, अर्चना इंगळे, सायली शिंदे (गृह उद्योजिका), संध्या शिंदे (स्वविकास केंद्र) आणि स्तनदा माता श्रद्धा जाधव यांचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला. सोनम राणे यांनी सूत्रसंचालन केले.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

# यंदा बकरी ईदला कायद्याचा दट्ट्या बसला! म्हणून...!!

### विहिंपचे राष्ट्रीय प्रवक्ते शंकर जी गायकर यांचे रोखठोक भाष्य

## संस्कृतीचा स्वीकार व सन्मान  हीच खरी राष्ट्रभक्ती; धर्मांतरणावर परखड विचार



सोलापूर:  यंदाच्या बकरी ईद काळात राज्य सरकारकडून कायद्याची अंमलबजावणी झाली. त्याचा दट्ट्या बसल्यामुळे बकरी ईदच्या दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहिली. प्रत्येक वेळी या सणाच्या काळात पशुधनाची बेकायदा अवैध वाहतूक, तस्करी, बेसुमार हत्या यांचा अवडंबर होतो. हिंदू समाजाला हेतुत: त्रास देऊन भावना दुखावण्याचा प्रकार होतो. त्याला आळा बसला. कारण  राज्य सरकारने कायद्यात असलेल्या तरतुदींची कार्यवाही केली, पोलीस प्रशासन देखील कठोर होते. त्यांनी कठोर भूमिका घेतली, असे रोखठोक भाष्य केंद्रीय सहमंत्री तथा राष्ट्रीय प्रवक्ते श्री शंकर जी गायकर यांनी केले.

शंकर जी गायकर सोलापुरात आले असता त्यांनी अक्कलकोट येथे बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना जिहादी घटकांकडून झालेली मारहाण, या निंदनीय प्रकाराबद्दल संबंधित गुन्हा दाखल झालेला आरोपी भाजपाचा नगरसेवक आणि अन्य आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली. तसेच यासंदर्भात मुख्यमंत्री आणि गृहमंत्रालयाकडे जाब विचारणार असल्याचे सांगितले. सोलापूर दौर्यात पत्रकारांशी संवाद साधताना प्रांत अध्यक्ष प्रा. गजानन धरणे, प्रांत गोरक्षा संवर्धनचे प्रमुख संतोष खामकर, प्रांत धर्माचार्य सहसंपर्क प्रमुख नागनाथ बोंगरगे, विभाग मंत्री विजयकुमार पिसे, सहमंत्री संजयकुमार जमादार, जिल्हामंत्री जयदेव सुरवसे, सहमंत्री विष्णू जगताप, बजरंग दल संयोजक अभय कुलथे, सहसंयोजक ऋषीकेश गंगदे आदी उपस्थित होते.

श्री गायकर म्हणाले, भारताला जगद्गुरू होण्याचे स्वप्न पूर्ण करायचे असेल, तर समाजाला आपली स्वीकारशक्ती वाढवावीच लागेल. इंडोनेशियातील मुस्लीम समाज ज्याप्रमाणे आपल्या मुळांचा आणि सांस्कृतिक वारशाचा अभिमान बाळगत जय श्रीरामचा जयघोष करतो, तशीच व्यापकता भारतीय मुस्लीम समाजाकडूनही अपेक्षित आहे. संस्कृतीचा सन्मान ही केवळ धार्मिक बाब नसून ती खरी राष्ट्रभक्ती आहे, असे  प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री शंकर जी गायकर यांनी केले.

स्लॉटर हाऊसची सक्ती: सामाजिक स्वास्थ्याचा लढा, गोमांस आणि बेकायदा कत्तलींच्या मुद्द्यावर गायकर यांनी प्रशासकीय ढिलाईवर निशाणा साधला. स्वच्छता आणि पर्यावरण रक्षणासाठी स्लॉटर हाऊसची व्यवस्था असताना, अनेकांनी नियमांना केराची टोपली दाखवली होती. घराघरांत सुरू असलेल्या या बेकायदेशीर कृत्यांमुळे अनेकांना आपली घरे सोडून स्थलांतर करावे लागले. विश्व हिंदू परिषदेच्या रेट्यामुळे सरकारला जीआर काढून यंदा कडक सक्ती करावी लागली. कोणावरही अन्याय न करता केवळ कायद्याची अंमलबजावणी केल्याने आज अनेक शहरांत शांतता आहे, हेच आमच्या संघर्षाचे यश आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.

कन्व्हर्जनचा कॅन्सर: संस्कारांवर आघात, सध्याच्या सामाजिक आव्हानांवर चिंता व्यक्त करताना श्री गायकर म्हणाले, लँड जिहाद आणि लव्ह जिहादच्या माध्यमातून आपल्या तरुणांना, विशेषतः मुलींना त्यांच्या मुळांपासून तोडण्याचे कारस्थान रचले जात आहे. धर्मांतराचा हा कॅन्सर समाजमनाला पोखरत आहे. संस्कार विसरून बाह्य प्रभावाखाली जाणारी युवा पिढी ही चिंतेची बाब असून, हे नॅरेटिव्ह मोडीत काढणे आता काळाची गरज बनली आहे.  युवा शक्तीचा महाराष्ट्र प्रथमचा निर्धार विश्व हिंदू परिषदेच्या विस्तारावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, रा. स्व. संघानंतर आज बजरंग दलाचे कार्यकर्ते राष्ट्र प्रथम हे व्रत घेऊन ठिकठिकाणी कार्यरत आहेत. नक्षलवादासारख्या हिंसक प्रवृत्तींना रोखण्यासाठी आमचे कार्यकर्ते त्यांच्याशी समरस होऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम करत आहेत. देशातील ७० हजार शाखांमधून आम्ही केवळ शाखा चालवत नसून एक राष्ट्रभक्त पिढी घडवत आहोत.  जगद्गुरू भारताचा मार्ग: त्याज्य ते टाकून, श्रेष्ठ ते स्वीकारून जे त्याज्य आहे ते सोडणे आणि जे श्रेष्ठ आहे ते स्वीकारणे, हाच भारताच्या प्रगतीचा मार्ग आहे. ५७ मुस्लीम देशांमध्ये भारताच्या नेतृत्वाचा आदर होतो, कारण आपण संस्कृतीच्या मूळ तत्त्वांवर ठाम आहोत. त्यामुळेच, भारतीय मुस्लीम समाजालाही राष्ट्रीयीकरणाच्या प्रवाहात येण्यासाठी आपल्या सांस्कृतिक मुळांचा अभिमानाने स्वीकार करावाच लागेल, असे आवाहन गायकर यांनी याप्रसंगी केले.

## ।। श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ।।

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि; श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे – ४१२२०७

कारखाना साईट : **EXABX No.** ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : **smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com**

## कारखान्याची ठळक वैशिष्टे

- ✻ १० **MW** क्षमतेचा पॉवर प्लँट
- ✻ ४५०० **TCD** ऊस गाळप क्षमता
- ✻ ८० **KLPD** क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
- ✻ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा **CNG** प्रकल्प
- ✻ ३० टन प्र. क्षमतेचा $CO^2$ प्रकल्प
- ✻ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
- ✻ ३ **KLPD** क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती **(2G R & D)** प्लँट

---

| मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत | मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर |
|---|---|
| अध्यक्ष व कार्यकारी संचालक | कार्याध्यक्ष |

---

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश संभाजीराव करपे | श्री. हेमंत संभाजीराव करंजे | श्री. योगेश दत्तात्रय ससाणे |
| श्री. अनिल जयवंतराव भुजबळ | श्री. किसन दिनकर शिंदे | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम |
| श्री. अनिल लक्ष्मण बधे | श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे | श्री. माधव पांडुरंग राऊत |
| सौ. लता सतिष केंढे | श्री. हनुमंत बबन शिवले | श्री. भगवान दशरथ मेमाणे |

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

## – मुख्य कार्यालय –

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# चांगल्या बातम्या

या चांगल्या गोष्टी/बातम्या आपणास आवडल्या तर पुढे कोणालाही पाठवाव्यात. आवडल्या नाहीत, तर मला कळवावे, अजिबात राग येणार नाही.

१) ३ जून रोजी मारुतीने  फ्लेक्झी फ्युएल वर चालणारी वॅगनर ही कार बाजारात आणली. ही कार एप २५ ते एप ८५ इंधनावर चालते. म्हणजे इथेनॉल २५% व पेट्रोल ७५% ते इथेनॉल ८५% व पेट्रोल १५% अशा कोणत्याही मिश्रणावर ती चालू शकेल. तसेच जेव्हा शुद्ध इथेनॉल उपलब्ध होईल, तेव्हा फक्त इथेनॉलवर सुद्धा ही कार चालेल.

या कार्यक्रमात बोलताना केंद्रीय मंत्री मा. नितीनची गडकरी यांनी सांगितले की पहिल्या टप्प्यात En ८५ पर्यंत चे इंधन असलेले ५० ते १०० पंप सुरू होतील. आणि डिसेंबर २६ अखेर असे ५०० पंप दिल्ली, मुंबई, पुणे, नागपूर या परिसरात सुरू होतील. हे En ८५ इंधन सध्या च्या पेट्रोल पेक्षा अंदाजे रुपये २० प्रति लिटर स्वस्त असेल. ते पुढे म्हणाले की भारतात सध्या Sustainable Aviation Fuel (SAF) ७८,००० टन प्रति वर्ष बनवले जाते. जे विमानात वापरले जाते. याचे उत्पादन ही वाढवले जात आहे. आणि येत्या २ वर्षात भारताची गरज भागून SAF निर्यातही केले जाईल.

तसेच भारतात आता हायड्रोजन इंधन बनू लागले आहे. आणि लवकरच देशातील १० प्रमुख रस्त्यावर (यामध्ये नोएडा ते दिल्ली – आग्रा, पुणे – मुंबई, अहमदाबाद – वडोदरा – सुरत, तिरुअनंतपुरम ते कोची, भुवनेश्वर – कोणार्क – पुरी वगैरे रस्ते आहेत.) हायड्रोजन वरील बसेस व ट्रक्स धावू लागतील या प्रकल्पात रिलायन्स, टाटा, एनटीपीसी व अशोक लेलँड सहभागी आहेत.

या सर्व गोष्टीमुळे भारताची कच्च्या तेलाची गरज खूप कमी होईल. त्याच कार्यक्रमात हिरो मोटोक्रॉप ने फ्लेक्झी फ्युएल वरील त्यांची स्प्लेंडर व एचएफ डीलक्स या दोन मोटरसायकली बाजारात आणल्या. महत्वाचे म्हणजे यांची किंमत पेट्रोल मोटरसायकल एवढीच असेल.

२) पुण्याच्या निबे इंडस्ट्रीज ने भारतीय बनावटीच्या वायू अस्त्र–१ या ड्रोन ची सैन्य दलाच्या देखरेखीखाली यशस्वी चाचणी घेतली. उत्तराखंड येथील जोशी मठाजवळ पहिली चाचणी घेतली. तर दुसरी चाचणी पोखरणच्या वाळवंटात. या चाचणीमध्ये ह्या ड्रोननी अपेक्षेप्रमाणे १४,००० फूट उंचीवरून, १० किलो वॉरहेड घेऊन, १०० किलोमीटर अंतरावरील लक्ष्यावर, १ मीटर परिघात अचूक मारा केला. इस्त्रायलच्या Elbit System कंपनीच्या सहकार्याने निबे इंडस्ट्रीजने हा ड्रोन बनवला आहे.

या ड्रोनचे वैशिष्ट्य म्हणजे आतापर्यंतचे ड्रोन ठराविक मार्गाने जायचे. पण वायू अस्त्र–१ हा ड्रोन १०० किलोमीटर वरील ऑपरेटरशी संपर्कात राहतो.  जिथून ड्रोन जात असतो त्या परिसराची पाहणी ऑपरेटर करू शकतो. व लक्ष्य निश्चित केल्यावर त्या ड्रोन मधून हल्ला केला जातो. यावरील इन्फ्रारेड कॅमेरा मुळे रात्रीचा हल्ला करणे ही शक्य आहे. विशेष म्हणजे हा ड्रोन हल्ला केल्यानंतर परत येऊ शकतो, व पुन्हा वापरता येतो.

सैन्य दलाने निबे इंडस्ट्रीजला जानेवारी २६ मध्ये सूर्यास्त्र या मल्टी रॉकेट लॉन्चरची २९३ कोटींची ऑर्डर दिली. या लॉन्चर मधून वेगवेगळ्या प्रकारची रॉकेट लॉन्च केली जातात. तसेच हा लॉन्चर हाय मोबिलिटी व्हील चॅसीस वर बसवला आहे. फायरिंग नंतर लगेच तो दुसऱ्या जागी हलवला जातो. त्यामुळे शत्रूच्या हल्ल्यापासून लॉन्चर चा बचाव होतो.

२५० व ३०० किलोमीटर पल्ला असलेल्या या रॉकेट लॉन्चर ची १८ व १९ मे रोजी यशस्वी चाचणी घेतली. १५० किलोमीटर पल्ला असलेल्या रॉकेटचा मारा अचूकतेने फक्त दीड मीटर परिघात झाला. तर ३०० किलोमीटर पल्ला असलेल्या रॉकेटची अचूकता २ मीटर परिघात आहे. सध्याच्या तोफखाना व लांब पल्ल्याच्या रॉकेट मधील टप्प्यासाठी या सूर्यास्त्र रॉकेट लॉन्चरचा उपयोग होणार आहे.

३) २९ मे रोजी डीआरडीओ आणि हवाई दलाने रुद्र – चश्रश्र या हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या भारतीय मिसाईल ची यशस्वी चाचणी घेतली. हे मिसाईल प्रामुख्याने शत्रूची संरक्षण यंत्रणा जसे रडार, कम्युनिकेशन स्टेशन, बंकर वगैरे उध्वस्त करण्यासाठी बनवले आहे. याचा टप्पा ३०० किमी असून ५.५ मॅक (ध्वनीच्या ५.५ पट) वेगाने हे मिसाईल जाते.

तसेच शत्रुने ऐनवेळी रडार स्टेशन बंद केले. किंवा जॅमर असला, तरीसुद्धा हे मिसाईल लक्ष्याचा अचूक वेध घेते. निश्चित लक्ष्याच्या ५ मिटर परिघात अचूक मारा करते.

सध्या SuA MKI फायटर जेट विमानातून हे डागले जाते. आणि लवकरच चळस २९ व Miraj २००० या विमानातूनही ते डागले जाईल. सध्या वापरल्या जाणाऱ्या रशियन Kh-31 मिसाईल ची जागा घेईल.

४) भारत सध्या जागतिक स्तरावर तोफांचा मोठा निर्यातदार बनला आहे. ८५ पेक्षा जास्त देशांमध्ये भारतातून वेगवेगळ्या प्रकारच्या तोफा, रॉकेट लॉन्चर, तसेच वाहनांवर बसवलेल्या आणि कमी वजनाच्या तोफ यंत्रणा, तोफगोळे, व त्यांचे काम्पोनंट वगैरे निर्यात केले जातात .

हजारो कोटी रुपयांच्या ऑर्डर्स सरकारी म्युनिशन इंडिया व अनेक खाजगी कंपन्या कडे आहेत. भारत फोर्ज कंपनीने १५५ मि.मि. कॅलिबर च्या १०० तोफांची निर्यात केली आहे.

डीआरडीओ ने डेव्हलप केलेल्या १५५ मिमि कॅलिबरच्या 'Howitzer' तोफा ह्या जगातील सर्वात श्रेष्ठ तोफा समजल्या जातात. आणि जगभर त्या मोठ्या प्रमाणावर निर्यात होतात. पिनाक मल्टी बॅरल रॉकेट लॉन्चर ही मोठ्या प्रमाणावर निर्यात होतात.

पुण्याच्याकल्याणी कंपनीने अमेरिकेच्या एएम जनरल कंपनीबरोबर १०५ आणि १५५मिमि कॅलिबरच्या अल्ट्रा लाईट तोफा पुरवण्याचा करार केला आहे. या तोफा अमेरिकेला व जगभर पुरवल्या जातील.

भारताची एकूण संरक्षण सामुग्री निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. मागील वर्षी २०२५–२६ मध्ये निर्यात ३८,४२८ कोटी रुपये झाली. ज्यात खाजगी उद्योगांचा वाटा १७,३३० कोटी रुपये (मागील वर्षी १३,९६८) व सरकारी उद्योगांचा वाटा २१,०१७ कोटी रुपये (मागील वर्षी८,३८९ कोटी). सरकारी उद्योगांचा वाटा मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.

५) ११ जुलै २०२२ रोजी रिझर्व्ह बँकेने रुपयाचे आंतरराष्ट्रीयिकरण करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू केली. भारतीय रुपया अजून पूर्णपणे परिवर्तनीय नाही. आणि तो टप्प्याटप्प्याने केला जाईल. आणि रुपयाचे आंतरराष्ट्रीयिकरण करण्यासाठी ते आवश्यक ही आहे. सध्या जागतिक पातळीवर अमेरिकन डॉलर हे चलन ८९% वापरले जाते. त्या पाठोपाठ युरो, जपानी येन, इंग्लंड चा पाउंड आणि चिनी चलना चा वापर होतो. नाणेनिधीनेही वरील पांच चलनांची बास्केट केली आहे. आणि त्या बास्केट चा उपयोग सदस्य देशांच्या आर्थिक स्थितीच्या पाहणीसाठी केला जातो. आता त्या बास्केटमध्ये ६ वे चलन म्हणून रुपया समाविष्ट करावा, असे आवाहन भारताने केले आहे.

रिझर्व बँकेने अन्य देशांशी रुपयांत व्यवहार करण्याच्या दृष्टीने अनेक देशांशी व त्यांच्या बँकांशी करार केले आहेत. आणि त्यासाठी वोस्ट्रो खाती उघडण्याची सुविधा केली आहे.

सध्या २२ देश भारताशी रुपया मध्ये व्यापार करतात. ज्यामध्ये प्रामुख्याने युएइ, इस्रायल मॉरिशस, युके, जर्मनी, रशिया न्यूझीलंड आणि भारताचे शेजारील देश आहेत.

२०२५–२६ मध्ये भारताची आयात, रुपये चलनात, २ लाख ८५ हजार कोटी रुपये (मागील वर्षी २०२४–२५ मध्ये २ लाख ६० हजार कोटी रुपये) तर निर्यात ३ लाख २७ हजार कोटी रुपये (त्या मागील वर्षी ३ लाख ७ हजार कोटी रुपये) झाली. दरवर्षी यामध्ये चांगली वाढ होत आहे.

रुपयांत आयात, निर्यात वाढली तर विदेशी गंगाजळी वाचेल. भारताचा जागतिक प्रभाव वाढेल आणि डॉलरच्या चढ–उताराचा फटका भारतीय व्यापारी/ उद्योजक यांना बसणार नाही.

६) जागतिक डिजिटल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्षेत्रात, भारत वेगाने महासत्ता म्हणून उदयास येत आहे. भारत जागतिक स्तरावर डिजिटल अर्थव्यवस्थेत ५ व्या स्थानावर आणि (AI) कार्यक्षमतेत (AI performance) ४ थ्या स्थानावर आला आहे. जगातील एकूण AI वापरकर्त्यांपैकी तब्बल २६% वापरकर्ते भारतात आहेत.

भारताकडे जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा (AI) टॅलेंट पूल (प्रतिभावान मनुष्यबळ) आहे. युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (UPI) आणि आधार (Aadhaar) सारख्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमुळे भारतात डिजिटल क्रांती झाली आहे.

स्थानिक भाषांमध्ये सेवा देण्यासाठी Bharat GPT आणि इतर स्थानिक मॉडेल्सचा विकास वेगाने होत आहे.

इंडिया एआय अभियान (India AI Mission) आणि तिसरीपासून शालेय स्तरावर (AI) चे शिक्षण देण्याचा धाडसी निर्णय भारताने घेतला आहे.

भारत (AI) च्या वापरात आणि प्रतिभेत पुढे असला, तरी जागतिक स्तरावरील एकूण खाजगी (AI) गुंतवणुकीत भारताचा वाटा फक्त १% इतकाच आहे. आणि तो लवकर मोठ्या प्रमाणात वाढायला पाहिजे.

**कुमार आठवले**

# गुरु शिष्य परंपरा - ज्ञानाचा अखंड स्रोत!

भारतीय संस्कृतीला अनेक अनन्य साधारण दिनविशेष व परंपरा लाभल्या आहेत. जेणेकरून त्या त्या दिवसाचे महत्त्व समजून घेता यावे तसेच ते आत्मसात करून आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवून ते आपल्या पुढील पिढ्यांना प्रेरित करावे. यातील एक विशेष महत्व प्राप्त असणारा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा !

गुरुपौर्णिमा हा दिवस आपण आषाढ महिन्यातील पौर्णिमेला साजरा करतो. तसेच या दिवसाचे औचित्य साधून व्यासगुरु यांचे स्मरण करून त्यांचे पूजन केले जाते. कारण सनातन धर्मात व्यासांनीच गुरु– शिष्य परंपरेला एक स्थान निर्माण करून दिले. म्हणूनच आपण या लेखात सनातन धर्म आणि भारतीय संस्कृती ला लाभलेल्या गुरु– शिष्य परंपरेविषयी जाणून घेणार आहोत.

गुरू–शिष्य परंपरा ही ज्ञान, अध्यात्म आणि मूल्ये एका पिढीतून दुसऱ्या पिढीत अखंडपणे हस्तांतरित करण्याची प्राचीन भारतीय पद्धत आहे. या परंपरेत गुरु शिष्याला केवळ शिक्षणच देत नाहीत, तर त्याच्या जीवनातील अज्ञानाचा अंधकार दूर करून आत्मज्ञानाचा मार्ग दाखवतात. प्राचीन काळापासून चालत आलेल्या या परंपरेमुळेच वेद, उपनिषदे आणि विविध कलांचे ज्ञान आजतागायत टिकून राहिले आहे. गुरु शिष्य परंपरेमुळे गुरुकुल पद्धत जन्मास आली. पूर्वी शिष्य उपनयन संस्कार झाला की गुरुकुलमध्ये जाऊन गुरुंच्या आश्रयात शिक्षण घेत असत. यात पुस्तकी ज्ञानासोबतच जीवन जगण्याची कला, शिस्त आणि संस्कार शिकवले जात.

सनातन धर्म हा खूप प्राचीन काळापासून प्रचलित असून तो अनेक देशात मानला जातो. त्यामुळे शीख, जैन, बौद्ध, वारकरी संप्रदाय या आणि अशा विविध धार्मिक संघटनांना आध्यात्मिक आणि सांसारिक गुरु शिष्य परंपरेचा वारसा लाभला आहे. गुरु शिष्याला सांसारिक मोहातून मुक्त करून आत्मज्ञान आणि मोक्षाचा मार्ग दाखवतात. तसेच केवळ अध्यात्मच नाही तर व्यावहारिक ज्ञान देऊन विद्या, आयुर्वेद, संगीत, युद्धकला आणि इतर प्राचीन विद्या देखील गुरु–शिष्य परंपरेतून शिकवल्या जातात.

अशाच काही गुरु शिष्य परंपरा थोडक्यात खालीलप्रमाणे:–

१) भुतलावर भगवान ब्रह्मा आणि शिव यांना पहिले गुरु मानले जातात. जेव्हा ब्रह्माजींनी आपल्या मानस पुत्रांना शिकवले तेव्हा शिवाने आपल्या ७ शिष्यांना शिक्षण दिले ज्यांना सप्तऋषी म्हणतात. गुरु आणि शिष्य परंपरेची सुरुवात शिवानेच केली, त्यामुळे आजही तीच परंपरा नाथ, शैव, शाक्त इत्यादी सर्व संतांमध्ये पाळली जात आहे. आदिगुरू शंकराचार्य आणि गुरु गोरखनाथ यांनी ही परंपरा पुढे नेली.

२) श्री दत्तात्रेय भगवान हे शिवानंतरचे सर्वात मोठे गुरू मानले जातात. दत्तात्रेयाला ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तिन्हींकडून दीक्षा आणि शिक्षण मिळाले होते.तसेच भगवान दत्तात्रेय यांनी निसर्ग, प्राणी आणि मानवाकडून ज्ञान मिळवून एकूण २४ गुरु केले होते. त्यांच्याकडून त्यांनी वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये जगण्याचे धडे व गुण शिकले .

३) देवांचे पहिले गुरु अंगिरा ऋषी होते. त्यानंतर अंगिरांचे पुत्र बृहस्पती हे गुरू झाले. त्यानंतर बृहस्पतींचे पुत्र भारद्वाज गुरु झाले. याशिवाय प्रत्येक देवता हे कोणत्या ना कोणत्या देवतेचे गुरू राहिले आहेत.

४) सर्व असुरांच्या गुरूचे नाव शुक्राचार्य आहे. शुक्राचार्यांच्या आधी महर्षि भृगु हे असुरांचे गुरू होते.

५) भगवान परशुरामांचे गुरू स्वतः भगवान शिव आणि भगवान दत्तात्रेय होते. भगवान श्री रामाचे गुरु ऋषी वशिष्ठ आणि विश्वामित्र होते. हनुमानजींचे गुरु सूर्यदेव, नारद आणि मातंग हे ऋषी होते. भगवान श्री कृष्णाचे गुरु गर्गा मुनी, सांदीपनी ऋषी आणि वेद व्यास ऋषी होते. गुरू विश्वामित्र, अलारा, कलाम, उदका रामापुत्त इत्यादी भगवान बुद्धांचे गुरू होते.

६) महाभारतातील गुरु: महाभारत काळात गुरु द्रोणाचार्य हे एकलव्य, कौरव आणि पांडवांचे गुरु होते. परशुरामजी हे कर्णाचे गुरू होते.

७) आचार्य चाणक्यचे गुरु: चाणक्यचे गुरु त्यांचे वडील चाणक होते. आचार्य चाणक्य हे महान सम्राट चंद्रगुप्ताचे गुरु होते. चाणक्याच्या काळात अनेक महान गुरू होऊन गेले.

८) गुरू गोरखनाथांचे गुरू: नवनाथांचे महान गुरू गोरखनाथ, मत्स्येंद्रनाथ (मच्छंदरनाथ) यांचे गुरू होते, ज्यांना ८४ सिद्धांचे गुरू मानले जाते.

हिंदवी संस्कृती, स्वराज्य आणि इतिहासामध्ये गुरु शिष्य परंपरेला अनन्य साधारण महत्व आहे एकदा एका विदेशी व्यक्तीने स्वामी विवेकानंद यांना प्रश्न विचारला, ''भारताचे एका वाक्यात वर्णन करायचे झाल्यास कसे कराल ?'' तेव्हा स्वामी विवेकानंद यांनी सांगितले, ''गुरु–शिष्य परंपरा !'' गुरु–शिष्य अशा सुरेख संगमातून महान राष्ट्राच्या निर्मितीची अनेक उदाहरणे पुराणकाळापासून इतिहासापर्यंत पहायला मिळतात . श्रीराम आणि वसिष्ठ, पांडव आणि श्रीकृष्ण इत्यादी. यांच्या जोडीला चंद्रगुप्त मौर्य–आर्य चाणक्य यांचे उदाहरणही आहे. चंद्रगुप्ताला आर्य चाणक्यांनी गुरु म्हणून मार्गदर्शन केले आणि एका बलशाली राष्ट्राची उभारणी केली. छत्रपती शिवाजी महाराज यांना समर्थ रामदासस्वामी आणि संत तुकाराम महाराज यांनी मार्गदर्शन केले अन् छत्रपती शिवाजी महाराज यांनी ५ पातशाह्यांना पराभूत करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.म्हणूनच आपल्याला असे म्हणायला हरकत नाही की, गुरू परंपरा म्हणजे ज्ञानाचा असा अखंड प्रवाह जो पिढ्यानपिढ्या गुरूंकडून शिष्याकडे सोपवला जातो. ही केवळ माहितीची देवाणघेवाण नसून, एका जागृत चैतन्याकडून दुसऱ्या आत्म्याकडे होणारे ज्ञानाचे हस्तांतरण आहे. भारतीय संस्कृतीत यालाच अखंड ज्ञान शृंखला मानले जाते.

या सर्व आदर्शांतून गुरु–शिष्य परंपरेची महानता लक्षात येते. गुरु शिष्याच्या केवळ आध्यात्मिकच नव्हे, तर व्यावहारिक उन्नतीचीही काळजी घेतात. त्यामुळे राष्ट्रउभारणीसाठी गुरु–शिष्य परंपराच आवश्यक आहे. गुरु–शिष्य परंपरा पुनरुज्जीवित करण्यासाठी भारत पुनःश्च हिंदु राष्ट्र बनणे आवश्यक आहे.

**अॅड. स्वाती जेरे**

**नाशिक**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# जागतिक पर्यावरण दिवस - माझा सहभाग माझी जबाबदारी

**आनंदी आनंद गडे**
**इकडे तिकडे चोहिकडे**
**वरती खाली मोद भरे**
**वायू संगे मोद फिरे ।**
**नभांत भरला**
**दिशांत फिरला जगांत उरला**
**मोद विहरतो चोहिकडे ।।**

बालकवी ठोंबरे यांची निसर्गसौंदर्याचा आनंद घेताना केलेली कविता पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत समर्पक व सार्थ होती, याचे आता प्रत्यंतर येते. निसर्गसौंदर्यामुळे येणारी आनंदाची अनुभूती अत्यंत सोप्या आणि साध्या शब्दांमध्ये त्यांनी सांगितली आहे. त्याचे महत्त्व किती आहे हे आता मनापासून पटते.

आनंद निर्मिती व्हावी हे बालकवींचे स्वप्न साकारण्यासाठीच जणू ५ जून १९७२ ला एक जागतिक परिषद भरली असे म्हटल्यास अतिशयोक्ती नक्कीच होणार नाही.

दिनांक ५ जून १९७२ रोजी पर्यावरणासाठी झालेल्या महासभेत पृथ्वीचे संरक्षण आणि त्या भोवती शुद्ध वातावरण निर्मिती करण्यासाठी दरवर्षी दिनांक पाच जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्यात यावा असा ठराव मंजूर झाला व १९७३ पासून पाच जून हा सर्व विश्वात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला.

विश्वाच्या निर्मितीनंतर मानवाने प्रगती करताना केलेल्या अनेक चुका वातावरण अशुद्ध करण्यास कारणीभूत झाल्या. जागतिक औद्योगीकरणाच्या नावाखाली निसर्गाच्या विरोधात जाऊन केलेल्या सुधारणांमुळे पर्यावरण दिन साजरा करण्याची वेळ आज सगळ्यांवर आली आहे. निसर्गावर मानवाने केलेले अतिक्रमण, युद्धे, औद्योगीकरण, या सर्वांमुळे दूषित झालेले वातावरण, पशुपक्षांची हानी, मानवाचे धोक्यात आलेले आरोग्य, राहणीमान, जनजीवन यावर ताबडतोब सकारात्मक विचार होऊन वरील निर्णय घेण्यात आला. तसेच पृथ्वी व त्यावरील वातावरण हे मानवी जीवनाला कसे पूरक, पोषक आणि शुद्ध केले जाईल याविषयी ठोस उपाययोजना करण्यास जागतिक परिषदेत सहभागी झालेल्या ११९ देशांनी मान्यता दिली.

**पर्यावरण या शब्दाचा अर्थच परि+आवरण**

म्हणजेच आपल्या आजूबाजूचा परिसर, आपले सभोवतालचे वातावरण, आकाश, हवा, पाणी यातील सजीव निर्जीव घटक मिळून पर्यावरण तयार होते. सद्यस्थितीत ते इतके बिघडले आहे की, त्यामुळे सर्वत्र रोगराई पसरून मानवी जीवन धोक्यात आले आहे. श्वसनाचे रोग, साथीचे रोग, कर्करोग वेगवेगळ्या एलर्जी, यासारखे भयानक आजार सगळीकडे फैलावत आहेत. त्यासाठी प्रत्येकाने फूल ना फूलाची पाकळी म्हणून स्वतःची जबाबदारी ओळखून त्यात सहभाग घेतला तर शासनाने नियोजित केलेल्या योजनांना चांगला हातभार लागून मानवी जीवन निरामय होण्यास मदत नक्कीच होईल.

अमेरिकेसारख्या प्रगत देशामध्ये यासाठी अगदी लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत कशी काळजी घेतली जाते हे जवळून पाहण्याची संधी मला यावर्षी मिळाली. सर्वजण स्वतःचे घर, परिसर, अंगण, आजूबाजूचे रस्ते सर्व सार्वजनिक स्थाने स्वच्छ ठेवतातच, परंतु शासकीय नियमांचे अत्यंत कसोशीने पालन करतात. याची शिकवण अगदी शिशु शाळेतल्या मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांना दिली जाते व शिस्तपालन करण्याची सवय लावली जाते. त्यामुळे स्वच्छ हवा, निरभ्र आकाश, शुद्ध पाणी, सगळीकडे मोकळ्या जागेत हिरवळ, रस्त्याच्या दुतर्फा विविध प्रकारची हिरवीगार झाडे, विविध रंगाची सुंदर फुले, प्लास्टिकचा कमीत कमी वापर धुळीचा लवलेशही नाही यामुळे सगळीकडचे झालेले प्रसन्न व आनंदी निरोगी वातावरण पाहिले व आपणही असे आपल्या देशात, गावात स्वतः सहभाग घेऊन आपली जबाबदारी ओळखून काहीतरी करावे असे ठरवले.

**वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे,**
**पक्षी हो सुस्वरे आळवीती।**

असे तुकाराम महाराजांनी म्हटलेच, आहे. वृक्षांशिवाय मानवी जीवन शून्यतम आहे. हवा शुद्धीकरण, पक्षांचे पालन पोषण, मातीचा कस वाढवणे, पावसामध्ये वाढ करणे, पृथ्वीचे वातावरण थंड करणे, ग्लोबल वॉर्मिंग कमी करणे असे अनंत उपकार निस्वार्थीपणे वृक्ष आपणावर करत असतात, म्हणून ‌‌झाडे लावा झाडे जगवा‌अर्थात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन हे आचरणात आणले पाहिजे. शहरीकरणामुळे होणारी वृक्षतोड थांबवली पाहिजे. तरच पर्यावरणाची हानी कमी होईल. एका कवीने म्हटल्याप्रमाणे,

**जीवन का आधार है वृक्ष**
**पृथ्वी का शृंगार है वृक्ष ।**
**प्राणवायू दे रहे है हम सबको**
**ऐसे परम उदार है वृक्ष।।**

प्लास्टिकचा अतिरेक वाढल्यामुळे पर्यावरणाचा नाश होतो आहे. निर्माण झालेले प्लास्टिक नष्ट व्हायला चारशे वर्षे तरी लागतात असे म्हणतात, त्यामुळे प्लास्टिकची निर्मिती आणि वापर हा आपण पूर्णपणे थांबवला पाहिजे. 'प्लॅनेट ऑर प्लास्टिक' याचे भान ठेवले पाहिजे.

स्वच्छ पिण्याचे पाणी मिळण्यासाठी नद्यांमधील प्रदूषण थांबवणे आणि सांडपाण्याची योग्यरित्या विल्हेवाट लावणे याला प्राधान्य दिले पाहिजे.

कचऱ्याची योग्य अशी विल्हेवाट करण्याचे व्यवस्थापन करून वातावरण दूषित होणार नाही, धूम्र प्रदूषण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

ध्वनी प्रदूषण थांबवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अनेक आवाज नष्ट अथवा अत्यंत संयमित ठेवले पाहिजेत.

हे सर्व पाहिल्यावर पर्यावरणाचा ऱ्हास थांबवून विकास करण्यासाठी आधी स्वतःपासूनच सुरुवात करावी हे ओळखून मी आपल्या परीने यात खारीचा वाटा उचलण्याचे ठरवले.

'कल करे सो आज कर आज करे सो अब'

या न्यायाने आधी घर आणि परिसरा साठी काय करता येईल याचे विचारपूर्वक नियोजन केले.

घरातील सुका कचरा, ओला कचरा वर्गीकरण, ई कचऱ्याचे योग्यरित्या निर्मूलन, इतर कचऱ्यात तो मिसळणार नाही याची दक्षता, नळाच्या पाण्याचा अपव्यय टाळणे, जरुरी पुरते पिण्याचे पाणी वापरणे, विजेचा योग्य वापर, या गोष्टी ताबडतोब अंमलात आणल्या.

प्लास्टिक ऐवजी कापडी, कागदी पिशव्यांचा वापर सुरू केला घरातील ड्रेनेजचे पूर्ण व्यवस्थापन, कचरा इतरत्र न फेकणे, रेडिओ टीव्ही चा आवाज कमी ठेवणे, धूम्र प्रदूषण टाळणे या सर्व गोष्टी केल्या.

हॉस्पिटलमधील कचऱ्याचे देखील जैविक आणि अजैविक अशी व्यवस्थित विभागणी करून शासनाच्या निर्मूलन योजनत सहभागी होणे, इलेक्ट्रिक वाहन वापरण्यास प्राधान्य देणे आणि वाहनाचा कमीत कमी वापर, हॉर्नचा कमीत कमी वापर या सर्वांची अंमलबजावणी करण्याचे ठरवले.

सार्वजनिक ठिकाणी सोसायटीमध्ये समाजात वावरताना स्वच्छता कचऱ्याचे योग्य वर्गीकरण होते की नाही हे पाहणे, रेन वॉटर हार्वेस्टिंग करून पाण्याचा अपव्यय टाळणे, वृक्षतोड थांबवणे, सोलर सिस्टिम ला प्राधान्य देणे, ऑफिस, हॉस्पिटल मध्ये कमीत कमी कागदाचा वापर करणे, नो प्लास्टिक मोहीम राबवणे, या सर्वांमध्ये सहभाग घेऊन जनजागरण करण्याचे मी ठरवले. पर्यावरणाचे महत्त्व पटवून देऊन त्यासाठी प्रशिक्षण देणे यासाठी ठिकठिकाणी सभा व व्याख्याने देऊन माझा वाटा उचलण्याचे ठरवले.



दर पावसाळ्यामध्ये एक तरी झाड लावण्याचा व त्याचे संवर्धन करण्याचा निर्णय घेतला आणि इतर मित्र, नातेवाईक, सामाजिक संस्था, मंडळे, संघटना यासाठी त्यांना प्रेरणा देऊन सहभागी केले.

अनेक ठिकाणी स्वच्छता मोहीमा राबवणे, धूम्रपान, रस्त्यावर थुंकू नये यासाठी जनजागरण करणे दुकानदारांना प्लास्टिक टाळून कापडी कागदी पिशव्या वापरण्यास भाग पडणे, या योजनांद्वारे अनेक पर्यावरण प्रेमी पर्यावरण स्नेही कसे तयार होतील यासाठी मी प्रयत्न करण्याचे ठरवले.

**केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे**

या समर्थांच्या वचनाप्रमाणे माझ्याकडून व्यक्तिगत 'पर्यावरण पूरकच वर्तन होईल आणि त्याचा ऱ्हास मी करणार नाही' अशी मी प्रतिज्ञा केली आपला देशही सुजलाम सुफलाम होण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले.

हा संकल्प प्रत्येकाने केला तर नक्कीच आनंदी आनंद गडे इकडे तिकडे चोहिकडे. आणि इयत्ता पहिलीच्या धड्यातील देवा तुझे किती सुंदर आकाश सुंदर प्रकाश सूर्य देतो, या काव्यपंक्ती नक्कीच सार्थ ठरतील.

पर्यावरणासाठी केलेल्या अनेक उपाययोजनांमुळे हा निर्भेळ आनंद, उत्तम निसर्ग सौंदर्य, स्वच्छ हवा, आणि शुद्ध पाणी, आल्हाददायी वातावरण याचा अनुभव आपल्या पुढच्या पिढीलाही उपभोगता येईल, आणि बालकवींच्या दुसऱ्या कवितेतील खालील वर्णनही सार्थ होईल हे निश्चितच.

**हिरवे हिरवे गार गालिचे**
**हरित तृणांच्या मखमालीचे ।**
**त्या सुंदर मखमाली वरती**
**फुलराणी ती खेळत होती ।।**

**डॉक्टर संजीव दाते,**
**जनरल सर्जन चिंचवड.**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

# लोकसंख्याशास्त्र

**लोकसंख्याशास्त्रीय बदल आणि त्यामुळे भारत व युरोप कसे कमकुवत होत आहेत.**

अवैध स्थलांतर आणि इतर असामान्य कारणांमुळे होणाऱ्या लोकसंख्याशास्त्रीय बदलांचा अभ्यास करण्यासाठी आणि या बदलांना तोंड देण्यासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी भारत सरकारने एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०२५ रोजी उच्चाधिकार लोकसंख्याशास्त्र अभियानाची घोषणा केली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाने ११ सप्टेंबर २०२५ रोजी या प्रस्तावाला मंजुरी दिली. न्यायमूर्ती प्रकाश प्रभाकर नवलेकर (निवृत्त) हे या समितीचे अध्यक्ष असतील. जनगणना आयुक्तांव्यतिरिक्त, श्री दुर्गा शंकर मिश्रा (निवृत्त आयएएस), श्री बालाजी श्रीवास्तव (निवृत्त आयपीएस) आणि डॉ. शमिका रवी हे तीन नामवंत तज्ञ समितीचे सदस्य असतील. गृह मंत्रालयाचे सहसचिव हे समितीचे सदस्य सचिव असतील.

**घुसखोरी मानवतावादविरोधी का आहे**

घुसखोरीचा मानवतावादाशी काहीही संबंध नाही; उलट, घुसखोरीला प्रोत्साहन देणे हे मानवतावादविरोधी आहे. मी हे यासाठी म्हणत आहे कारण केवळ भारतच नाही, तर अमेरिकेसह अनेक युरोपीय राष्ट्रे मुस्लिम घुसखोरीचा फटका अनुभवत आहेत. बलात्कार, लूटमार आणि इतर समाजविघातक कृत्यांमध्ये वाढ होत आहे. ते ज्या भागात घुसतात तो भाग अस्थिर, आक्रमक आणि बेकायदेशीर कृत्यांनी भरलेला बनतो आणि जसजशी त्यांची ताकद वाढते, तसतशी स्थानिक संस्कृती आणि कायदे नाहीसे होतात. स्थानिकांना घुसखोरांच्या परिसरात राहणे अशक्य वाटू लागते, त्यामुळे ते एकतर पळून जातात किंवा या घुसखोरांकडून रोजच्या छळाला सामोरे जातात. घुसखोर सर्व गोष्टींवर ताबा मिळवतात आणि आपल्या विचारसरणीनुसार लोकसंख्येची रचना बदलतात; त्यांना मानवतावादी कारणास्तव परवानगी देण्यात आली होती, हे ते विसरून जातात.

त्यांना त्या राष्ट्राबद्दल कोणताही स्नेह नसतो आणि तेथील कायदे किंवा संविधानाचे पालन केले पाहिजे असे त्यांना वाटत नाही, कारण ते तेथील नागरिक नाहीत. दीर्घकाळात, ही मानसिकता देशाची सुरक्षा कमकुवत करते, विशेषतः महिलांसाठी; सामाजिक–आर्थिक दृष्टिकोन, अस्वच्छ वर्तन, हिंसाचाराचे नवे स्वरूप, सामाजिक अशांतता, इतर संस्कृतींवरील हल्ले किंवा त्यांच्यावरील बंदी, आणि अमली पदार्थ, वेश्याव्यवसाय व इतर अवैध कृत्यांमध्ये होणारी प्रचंड वाढ, ज्यामुळे तरुण पिढी उद्ध्वस्त होते. त्यांना मोफत सरकारी योजनांमध्ये सहभागी होता यावे आणि मतदानही करता यावे, यासाठी बेकायदेशीर सरकारी प्रमाणपत्रे दिली जातात आणि स्थानिक सरकार व राजकारणी आपल्या लोभी हेतूंसाठी त्यांचा उपयोग करतात. ते स्थानिक रहिवाशांच्या नोकऱ्या चोरतात.

**मोठ्या प्रमाणावरील घुसखोरी, धर्मांतर आणि एकूण प्रजनन दर (TFR) यांचा भारतावर कसा परिणाम होतो**

बांग्लादेश, म्यानमार आणि पाकिस्तानमधून येणाऱ्या या घुसखोरांमुळे भारताला सर्वाधिक फटका बसला आहे. सीमावर्ती जिल्ह्यांचा सीमा सुरक्षेवर महत्त्वपूर्ण परिणाम झाला आहे आणि शेजारी देशांशी युद्ध झाल्यास ते एक मोठा धोका आहेत. आसाम, पश्चिम बंगाल, जम्मू आणि काश्मीर, लडाख आणि ईशान्येकडील राज्यांच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये होत असलेल्या अनैसर्गिक आणि वेगाने वाढणाऱ्या बदलांबद्दल आपली सरकारे आणि सशस्त्र दल चिंतित आहेत. अनेक प्रदेश, शहरे आणि गावांमध्ये हिंदू आता अल्पसंख्याक बनले आहेत. हिंदूंनी एकतर पलायन केले आहे, जबरदस्तीने इस्लाम धर्म स्वीकारला आहे किंवा ख्रिश्चन धर्म स्वीकारला आहे. विविध सरकारांनी वेगवेगळ्या वेळी वेगवेगळी आकडेवारी दिली आहे, जी प्रत्येक दशकात लोकसंख्येत वाढ दर्शवते.

ही घुसखोरी केवळ सीमावर्ती भागांपुरती मर्यादित नाही, तर ती भारतभरातील दुर्गम गावे आणि शहरांमध्ये पसरली आहे, ज्यामुळे त्या भागाची लोकसंख्याशास्त्रीय रचना बदलत आहे. १९९७ मध्ये, गृहमंत्री इंद्रजित गुप्ता यांनी सांगितले होते

की १ कोटी बांगलादेशी भारतात राहतात; २००४ मध्ये, काँग्रेसच्या राजवटीत, मंत्री श्रीप्रकाश जयस्वाल यांनी सांगितले होते की भारतात १.२ कोटी बांगलादेशी राहतात; आणि २०१६ मध्ये, मोदी सरकारमधील मंत्री किरेन रिजेजू यांनी सांगितले की भारतात २ कोटी बांगलादेशी राहतात. यात रोहिंग्या आणि पाकिस्तानी मुस्लिमांची गणना केलेली नाही. आपल्या १.४ अब्ज लोकसंख्येच्या राष्ट्रावर होणाऱ्या अशा मोठ्या आक्रमणाचे धोके आपण समजू शकतो का? राष्ट्र आणि नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचे मूल्यांकन आणि अंमलबजावणी करण्याच्या मोदी सरकारच्या प्रयत्नांना ओळखण्याची हीच वेळ आहे.

मोठ्या संख्येने लोकांचे इस्लाम आणि ख्रिस्ती धर्मात सक्तीने धर्मांतर करून बहुसंख्य अल्पसंख्याक निर्माण करणे, हा लोकसंख्याशास्त्रीय बदलाचा दुसरा पैलू आहे. ईशान्येकडील राज्ये, केरळ, तामिळनाडूचा काही भाग, आंध्र प्रदेश, तेलंगणा, आसाम, पश्चिम बंगाल, झारखंड, छत्तीसगड, मध्य प्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश, पंजाब इत्यादी. या भागांमध्ये हिंदू संस्कृती आणि चालीरीतींचा तिरस्कार करणारा धर्मांतरित समाज विकसित होत आहे, जे देशविरोधी कारवायांचे केंद्र बनत आहेत. असा समाज जो पाकिस्तानवर प्रेम करतो आणि भारताचा तिरस्कार करतो, किंवा जो राष्ट्र आणि समाजाला कमजोर करणाऱ्या मिशनरी संस्कृतीची पूजा करतो. गरीब अनुसूचित जाती,



अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांना भावनिक जाळ्यात अडकवून किंवा त्यांना तुटपुंजे अन्न किंवा रोख रक्कम देऊन धर्मांतर करण्यास फसवले जात आहे. सरकारांनी उचललेल्या ठोस पावलांना पूरक म्हणून, समाजाने निर्णायक कृती करून पाठिंबा दिला पाहिजे. प्रदेश आणि राष्ट्राला सुरक्षित करण्यासाठी, अनैतिक डावपेचांद्वारे लोकांना इस्लाम आणि ख्रिस्ती धर्मात धर्मांतरित करण्याचे या संघटनांचे अमानवीय प्रयत्न तात्काळ थांबले पाहिजेत.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS-5) नुसार, हिंदूंचा एकूण प्रजनन दर (TFR) १.९४ आहे, जो २.१ च्या प्रतिस्थापन पातळीपेक्षा (एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे लोकसंख्येची स्थिरता राखण्यासाठी आवश्यक असलेला दर) कमी आहे. मुस्लिमांचा एकूण प्रजनन दर (TFR) २.३६ असून तो अजूनही खूप जास्त आहे. हिंदू प्रजनन दर प्रतिस्थापन पातळीच्या खाली घसरल्यामुळे देशाच्या काही भागांमध्ये लोकसंख्या झपाट्याने वृद्ध होण्याच्या टप्प्याची सुरुवात होत आहे. दशकांपूर्वी, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक यांसारख्या राज्यांमध्ये–जी प्रामुख्याने हिंदूबहुल आहेत, परंतु त्यांची सामाजिक–सांस्कृतिक रचना भिन्न आहे–प्रजनन दर प्रतिस्थापन पातळीपेक्षा खूपच खाली (१.५ ते १.७ च्या दरम्यान) होता. त्यांची लोकसंख्या अधिकाधिक वृद्ध होत आहे. बिहार आणि उत्तर प्रदेशसारख्या उत्तरेकडील राज्यांमध्ये प्रजनन दर किंचित जास्त राखला जातो. याचा अर्थ असा की, इतर समाजांच्या तुलनेत हिंदू लोकसंख्या स्थिर होईल आणि त्यानंतर तिच्या एकूण संख्येत खूप लवकर घट होईल. बहुसंख्य मुस्लिम अजूनही शरियाचे पालन करतात, वारंवार विवाह करतात आणि गरिबीत जगत असूनही त्यांना अनेक मुले आहेत, तर अनेक हिंदूंना फक्त एकच मूल आहे किंवा बऱ्याच प्रकरणांमध्ये ते मूल न होण्याचे धोरण अवलंबतात. या गंभीर लोकसंख्याशास्त्रीय बदलामुळे संविधान, देशाचा कायदा, हिंदू आणि आपल्या या अद्भुत राष्ट्राचे सार्वभौमत्व या सर्वांनाच धोका पोहोचू शकतो.

### युरोपवर कसा परिणाम होत आहे

मध्य पूर्व, दक्षिण आशिया आणि उत्तर आफ्रिकेतील उच्च पारंपरिक प्रजनन दर असलेल्या भागांमधून आलेल्या मोठ्या मुस्लिम लोकसंख्येच्या आगमनामुळे स्थानिक लोकसंख्याशास्त्रीय रचना सक्रियपणे बदलल्या जात आहेत. युरोस्टॅटच्या

आकडेवारीनुसार, परदेशात जन्मलेले किंवा अनियमित स्थलांतरित तरुण वयोगटात मोठ्या प्रमाणात केंद्रित आहेत (जवळजवळ ७६% लोक काम करण्याच्या किंवा प्रजोत्पादनाच्या वयाचे आहेत), तर मूळ युरोपीय लोकसंख्या वेगाने वृद्ध होऊन निवृत्तीच्या मार्गावर आहे. लाखो लोक शासकीय एकीकरण, भाषा प्रशिक्षण आणि नागरी संरेखन कार्यक्रमांपासून दूर राहतात, कारण हे स्थलांतर कायदेशीर चौकटीबाहेर होते. माल्मो (स्वीडन), लंडन (यूके), सेंट-डेनिसचे काही भाग (पॅरिस, फ्रान्स) आणि जर्मनीमधील स्थानिक जिल्ह्यांसारख्या ठिकाणी, अनोंदणीकृत किंवा अयोग्यरित्या एकत्रित झालेल्या मुस्लिम लोकसंख्येच्या उच्च प्रमाणामुळे सार्वजनिक जागा कट्टरपंथीयांनी ताब्यात घेतल्या आहेत. परिणामी, प्रस्थापित युरोपीय कायदेशीर आणि सांस्कृतिक संस्थांची जागा अनधिकृत धार्मिक लवादांनी घेतली आहे, ज्यामुळे स्थानिक सांस्कृतिक मूल्यांशी मोठा संघर्ष निर्माण झाला आहे. हिंसाचार, बलात्कार आणि अवैध कारवायांमध्ये वाढ झाल्यामुळे या भागांमध्ये अस्थिरता आणि अशांतता पसरली आहे.

**निष्कर्ष**

१९५१ ते २०११ या काळात हिंदू लोकसंख्या वाढ ८४.१% वरून ७९.८% पर्यंत घटली, तर मुस्लिम लोकसंख्या वाढ ९.८% वरून १४.२% पर्यंत वाढली. संपूर्ण भारतभर होत असलेल्या सध्याच्या जनगणनेनंतर देशाला धक्कादायक आणि चिंताजनक लोकसंख्या वाढीचे नमुने पाहायला मिळतील. त्यामुळे, आपल्या राष्ट्राचे आणि आपल्या अद्भुत संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी, भारताला कमकुवत करणाऱ्या विविध भागांमध्ये होणाऱ्या कोणत्याही अनैसर्गिक लोकसंख्याशास्त्रीय बदलाला घटनात्मक तरतुदींनुसार कठोरपणे हाताळले पाहिजे.

**डॉ. पंकज जगन्नाथ जयस्वाल**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
# भाग - ३२

**द्वितीय सरसंघचालक**
**प.पू.श्री.माधव सदाशिव गोळवळकर गुरुजी**

सन १९३० मध्ये तत्कालीन बनारस येथे प्राणीशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम करत असणाऱ्या गोळवळकर गुरुजी यांचा तेथे शिकण्यास गेलेल्या भैय्याजी दाणींमुळे संघाशी संबंध आला. डॉ.हेडगेवार हे योजनापूर्वक नागपूर व परिसरातील तरुण कार्यकर्त्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी वेगवेगळ्या प्रांतात पाठवत होते, याच योजनेतून भैय्याजी दाणी हे बनारस या ठिकाणी शिकण्यासाठी गेले होते. त्यांच्यामुळेच सन १९३१ मध्ये गुरुजींचा पहिल्यांदा संघाशी संबंध आला व संघाला द्वितीय सरसंघचालक मिळाले.

१९ फेब्रुवारी १९०६, माघ कृ.११, विजयादशमी या दिवशी गुरुजींचा जन्म झाला. नऊ अपत्यांपैकी माधव हे एकटेच वाचले, इतर आठ अपत्ये जगू शकली नाहीत. माधव हा बालपणापासूनच प्रचंड बुद्धिमान, चिकित्सक पण तेवढाच अंतर्मुखी रमणारा. अशा माधवने नागपूर, चंद्रपूर पुणे व बनारस या ठिकाणी शिक्षण घेतले व ज्या महाविद्यालयात उच्च शिक्षण घेतले त्याच महाविद्यालयात ते प्राध्यापक म्हणून रुजू झाले. जसा अभ्यासू स्वभाव होता तेवढीच स्थितप्रज्ञता गुरुजींच्या ठायी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून तयार झालेली होती. एकदा त्यांच्या पायाला विंचू चावला होता, विंचू चावलेल्या जागी चिरा मारून पोटॅशियम परमॅग्नेटच्या पाण्यात पाय घालून ते अभ्यास करत बसले. याप्रसंगी कोणीतरी विंचू चावल्याची जाणीव करून देताच ते म्हणाले, विंचू पायाला चावलाय, डोक्याला नाही. त्यामुळे मला अभ्यास करायला काही अडचण नाही. अशी स्थितप्रज्ञता लाभलेल्या गुरुजींचा सन १९३३ मध्ये डॉ.हेडगेवारांशी नागपूर येथे संबंध आला.

संघाच्या कार्यामध्ये हळूहळू गुरुजी रमू लागले, त्याच दरम्यान वकिलीचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी वकिली व्यवसायालाही सुरुवात केलेली होती. नागपूरच्या तुळशीबाग शाखेचे कार्यवाह म्हणून त्यांनी पहिली जबाबदारी पार पाडली. त्यानंतर ते मुंबईत विस्तारक म्हणून गेले. संघाच्या कामात ते रमले म्हणत असतानाच नागपूरच्या रामकृष्ण मठात सातत्याने जाणे – येणे असल्यामुळे त्यांना अध्यात्माचीही ओढ लागली होती, यातूनच एक दिवस संन्यासवृत्तीची दीक्षा घेण्यासाठी ते स्वामी अखंडानंद यांच्या बंगालमधील सारगाछी आश्रमात गेले. स्वामी अखंडानंद हे स्वामी विवेकानंदांचे गुरुबंधू. गुरुजी आता संन्यास घेणार या गोष्टीचा डॉ.हेडगेवार यांच्यासहित सर्वांनाच धक्का बसला. आठ महिन्यानंतर संन्यास धर्माची दीक्षा घेऊन गुरुजी नागपूरला परतले. संन्यासी राहून केवळ स्वतःच्या मोक्षप्राप्तीकरिता साधना करण्याऐवजी संघाच्या कामात राहून देशाचं कार्य करण्याचा गुरुजींनी निर्णय घेतला व डॉ.हेडगेवारांबरोबर संघ कार्यात त्यांनी स्वतःला झोकून दिले.



नाशिक जिल्ह्यातील देवळाली येथे डॉ. हेडगेवार आजारी पडले, त्यावेळी गुरुजींनी अनेक दिवस त्यांची मनोभावे सेवा केली. वर्धा जिल्ह्यातील सिंदी येथे प्रमुख कार्यकर्त्यांची काही दिवस बैठक होती, या बैठकीत गुरुजी मनापासून सहभागी झाले. संघाच्या आज्ञा कोणत्या असाव्यात, संघाची प्रार्थना कोणती असावी? या विषयावर रोज आठ – आठ तास चर्चा चालत असे, अशा या चर्चेमध्ये गुरुजी सहभागी झाले व त्यांच्या विद्वत्तेचा व समर्पणभावनेचा अनुभव घेतल्यानंतर डॉ.हेडगेवार यांनी आपल्यानंतर श्री.गुरुजी सरसंघचालक असतील असे त्याचवेळी निश्चित केले. पुढे २१ जून १९४० रोजी डॉ.हेडगेवार यांचे निधन झाले व त्या दिवसापासून आपला शेवटचा श्वास घेण्याच्या क्षणापर्यंत ५ जून १९७३ पर्यंत जवळजवळ ३३ वर्षे गुरुजी सरसंघचालक म्हणून कार्यरत राहिले. संघाला सर्वव्यापी व सर्वस्पर्शी बनविण्यामध्ये गुरुजींचा मोठा वाटा आहे. प्रचंड मेहनत, प्रवास व सर्वस्वाचे समर्पण करून संघकाम वाढविण्यासाठी गुरुजींनी एक आदर्श निर्माण करून दिला. त्यांच्या मार्गदर्शनाने व त्यांच्याकडूनच प्रेरणा घेऊन लाखो स्वयंसेवक संघ कामांमध्ये तयार झाले व या स्वयंसेवकांनी समाजाच्या विविध क्षेत्रात जाऊन अनेक संस्था व संघटना उभ्या केल्या.

विश्व हिंदू परिषद, वनवासी कल्याण आश्रम, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, अखिल भारतीय मजदूर संघ, विवेकानंद केंद्र, जनसंघ अशा देशपातळीवर आपल्या कामाचा ठसा उमटवणाऱ्या कितीतरी संघटना गुरुजींच्या कल्पनेतून व मार्गदर्शनातून तयार झाल्या. संघाला खऱ्या अर्थाने समाजाभिमुख बनविण्याचे काम गुरुजींनी केले. डॉ.हेडगेवार यांच्या ह्यातीत भारतातल्या सर्व प्रांतापर्यंत पोहोचलेला संघ गुरुजींच्या कार्यकाळात देशातील बहुतांश जिल्ह्यापर्यंत पोहोचला. संघाला समाजाभिमूख बनवत असतानाच समाजाच्या गरजांचा विचार करून अनेक प्रकल्प गुरुजींच्या काळातच निर्माण झाले. या प्रकल्पातून समाजाच्या गरजांची पूर्तता करण्यात येत होती. समाजाला बरोबर घेऊन संघकाम पुढे नेण्याचे व हिंदू समाज संघटन बळकट करण्याचे काम गुरुजींनी केले. गुरुजींच्या कालखंडातच संघावर दोन वेळा बंदीही आली, अनेक संकटे निर्माण झाली. परंतु गुरुजींनी यावर मात करत संघ अधिकाधिक वृद्धिंगत बनविण्याचे कार्य केले. त्यामुळेच प.पू.श्री.गोळवलकर गुरुजी यांच्या विचारांवर संघाचे कोट्यावधी स्वयंसेवक आजही देशाची सेवा करताना दिसून येतात.

**डॉ. सचिन वसंतराव लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख, रा.स्व.संघ**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

।। श्री विठ्ठल परब्रह्मणे नमः।।

# आषाढी वारी : हिंदू धर्मातील भक्ती, अद्वैत आणि लोकविलक्षण साधना

हिंदू धर्मामध्ये तीर्थयात्रेला आणि ईश्वरी साधनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याच साधना मार्गाचे सर्वात प्रासादिक, सगुण आणि चैतन्यमय रूप म्हणजे महाराष्ट्रातील मआषाढी वारीफ केवळ भौगोलिक प्रवास नसून, वारी ही मजीवाचा शिवाशीफ होणारा संगम आहे. आषाढ महिन्यातील शुद्ध एकादशीला (देवशयनी एकादशी) पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी लाखो वैष्णव टाळ–मृदंगाच्या गजरात मार्गस्थ होतात.

## वारकरी संप्रदाय आणि हिंदू धर्म

आषाढी वारीचा पाया मवारकरी संप्रदायावरफ आधारलेला आहे, जो हिंदू धर्मातील भागवत धर्माची (वैष्णव संप्रदाय) एक अत्यंत महत्त्वाची शाखा आहे.

सगुण–निर्गुण समन्वय: विठ्ठल हे साक्षात विष्णूचे (कृष्णाचे) रूप मानले जाते. हिंदू धर्मातील मूर्तीपूजा (सगुण भक्ती) आणि संतांनी सांगितलेले आत्मज्ञान (निर्गुण भक्ती) यांचा अद्भुत संगम वारीमध्ये पाहायला मिळतो.



ज्ञान, भक्ती आणि कर्मयोग: श्रीमद्भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णाने सांगितलेल्या तीनही योगांचे (ज्ञान, भक्ती आणि कर्म) प्रत्यक्ष आचरण वारीच्या निमित्ताने पंढरीच्या वाटेवर घडते.

## वारीचे आध्यात्मिक आणि तात्त्विक महत्त्व

हिंदू धर्मशास्त्राच्या आणि वेदान्ताच्या दृष्टीने वारी ही केवळ एक यात्रा नसून, ती एक सामूहिक आध्यात्मिक साधना आहे:

### अद्वैत वेदांताचे प्रकटीकरण :

वेदान्त सांगतो की सर्वं खल्विदं ब्रह्म (सर्वत्र ईश्वर आहे). वारीमध्ये जेव्हा एक वारकरी दुसऱ्या वारकऱ्याच्या चरणावर डोके ठेवतो, तेव्हा तो समोरील व्यक्तीमध्ये असलेल्या विठ्ठलालाच (परब्रह्माला) नमन करत असतो. इथे उच्च–नीच, जात–पात हा भेद संपून 'अद्वैत' भावना निर्माण होते.

नामस्मरण साधना (भक्तियोग): कलियुगात ईश्वर प्राप्तीसाठी 'नामस्मरण' हा सर्वात सोपा मार्ग सांगितला आहे. वारीमध्ये संपूर्ण २५० किलोमीटरच्या प्रवासात मुखात निरंतर असणारा ज्ञानोबा माउली तुकाराम आणि विठ्ठल विठ्ठल हा मंत्र नामसाधनेची पराकाष्ठा आहे.

### अहंकार विसर्जन:

डोक्यावर तुळशीवृंदावन किंवा पताका घेऊन अनवाणी पायाने चालताना, साधकाचा ममीफ्पणा (अहंकार) गळून पडतो आणि तो पूर्णपणे भगवंताला शरण जातो (शरणागती भाव).

## ऐतिहासिक आणि पौराणिक संदर्भ

पौराणिक कथेनुसार, द्वापारयुगात भगवान श्रीकृष्ण आपले परमभक्त पुंडलिक याच्या मातृ–पितृ भक्तीवर प्रसन्न होऊन पंढरपुरात आले. पुंडलिकाने भगवंताला उभे राहण्यासाठी एक वीट दिली. 'युगे अठ्ठावीस' म्हणजेच २८ युगांपासून तो

परमात्मा विठ्ठल रूपाने त्याच विटेवर कटिवर हात ठेवून भक्तांची वाट पाहत उभा आहे, अशी हिंदू भाविकांची गाढ श्रद्धा आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ, आणि आदिमाता संत मुक्ताबाई या संतांनी या वारीच्या परंपरेला लोकचळवळीचे स्वरूप दिले.

**आषाढी एकादशी (देवशयनी एकादशी) चे महात्म्य**

हिंदू पंचांगानुसार, आषाढी एकादशीला 'देवशयनी एकादशी' म्हणतात. पौराणिक मान्यतेनुसार, या दिवशी भगवान विष्णू क्षीरसागरात चार महिन्यांसाठी (चातुर्मास) योगनिद्रेत जातात. म्हणून, प्रभू निद्रेत जाण्यापूर्वी त्यांचे रूप डोळ्यात साठवून घेण्यासाठी आणि त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी आषाढी वारीला अनन्यसाधारण आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

माझे माहेर पंढरपूर... हिंदू धर्मात पंढरपूरला 'भूवैकुंठ' (पृथ्वीवरील वैकुंठ) म्हटले गेले आहे. जिथे साक्षात परब्रह्म भक्तांसाठी उभा आहे.

**निष्कर्ष**

आषाढी वारी हा हिंदू धर्मातील मवसुधैव कुटुम्बकम्फ(संपूर्ण जग हेच माझे कुटुंब आहे) या उदात्त विचाराचे जिवंत उदाहरण आहे. चंद्रभागेच्या पात्रात स्नान करून, कपाळावर बुक्का लावून जेव्हा भाविक विठ्ठलाच्या मूर्तीसमोर नतमस्तक होतो, तेव्हा त्याला मोक्षाची अनुभूती प्राप्त होते. वारी ही हिंदू संस्कृतीची ती अमूल्य धरोहर आहे, जी मानवाला ईश्वराकडे आणि मानवतेकडे नेणारा राजमार्ग दाखवते.

।। जय जय विठ्ठल जय हरी विठ्ठल ।।


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**


आपल्या स्वप्नांना द्या जनसेवेचे पंख...
चारचाकी...
स्वत:साठी असो अथवा व्यवसायासाठी,
खरेदीसाठी एकाच पर्याय ....
जनसेवा कर्ज !
TUCSON
आपल्या आवडत्या
टू व्हिलरसाठी
किफायती
कर्ज फक्त जनसेवेचे !
स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
स्वत:चे घर,
ठेवा विश्वास
जनसेवेच्या 'घरकुल' कर्जावर !
करा जगाची सफर !
जनसेवा आहे हमसफर !
जनसेवा पर्यटन कर्ज
• आकर्षक व्याजदर • तत्पर सेवा • अल्प प्रोसेसिंग फी
संपर्क : 8485871252
www.janasevabankpune.bank.in
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय :
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

वार्षिक वर्गणी रू. २००/- फक्त

Date of Publication : 26/06/2026 and
Date of Posting : 28/06/2026 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध
(मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे **'हिंदुबोध'.**

- मासिक मुल्य रु. २०/- • वार्षिक वर्गणी रु. २००/- • त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

oooo

## ✻ हिंदुबोध जाहिरात दरपत्रक ✻

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | | | |
|---|---|---|---|
| रंगीत पूर्ण पान रु. १.५ लाख | साधे पान रु. १ लाख | साधे अर्धे पान रु. ५०,०००/- | साधे १/४ पान रु. २५,०००/- |
| साधे १/८ पान रु. १२,०००/- | साधे १/१६ पान रु. ६,०००/- | सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) रु. २,१००/- | |
| हिंदुबोध अंक मुल्य रु. २०/- | वार्षिक वर्गणी रु. २००/- | त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/- | |

## ✻ हिंदुबोधची वर्गणी ✻

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**

द्वारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२

विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,

भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१